## वास्तुरहस्य

या दिवाळी अंकाचे यंदाचे तिसरे वर्ष आहे. प्रामुख्याने घर विकत घेताना वास्तुशास्त्रदृष्ट्या जागेमध्ये कोणते दोष असू शकतात, त्यावर कोणते उपाय करता येतात याविषयी तर माहिती आहेच. त्याचबरोबर 'वास्तुशास्त्र किती खरे किती खोटे' हा मुकुंद काणे यांनी लिहिलेला लेखही आहे. वास्तु खरेदी करताना कुणी या वास्तुचा दरवाजा अमूक दिशेला आहे त्यामुळे अशुभ आहे किंवा यासारखे उद्गार काढले की वास्तु खरेदी करणारी व्यक्ती एकदम




घाबरून जाते. परंतु, कुणाच्या तरी बोलण्यावरून अर्धवट माहिती असेल तर गोंधळ होण्याचाच संभव अधिक असतो यावर प्रकाश टाकून मुकुंद काणे यांनी वास्तुशास्त्राचा विचार करताना अथवा वास्तुशास्त्रानुसार आपल्या घराच्या रचनेत बदल करताना नीट विचार करणे, अंधश्रद्धा न बाळगणे आवश्यक आहे, असे सुचविले आहे. गेल्या वर्षीप्रमाणेच याही अंकात डॉ. प. वि. वर्तक यांचा 'घर पाहावे बांधून...' हा लेख आहे. यात समर्थ रामदास स्वामी आणि अन्य संतांनी घरबांधणीविषयी काय म्हटले आहे त्याचे संदर्भ आहेत. सुधाकर बापट अजित जाधव, डॉ. मधुसूदन घाणेकर आदींचे लेख आहेत. वास्तुशास्त्रविषयक सोप्या भाषेत माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

**संपादक - बबनराव पाटील**

**पृष्ठे - २०८, मूल्य - रुपये ७५**